महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई ४०० ००१

दूरध्वनी क्र : ०२२-२२०६०५६८
Email ID :
soyoj१०.rdd-mh@nic.in
hemant.pathak@nic.in

---

क्रमांक : प्रआयो-२०१८/प्र.क्र.२५६/यो-१०

दिनांक : २३ फेब्रुवारी, २०२१.

प्रति,
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, (सर्व).

विषय:- ग्रामीण भागातील शासकीय जमिनीवरील निवासी प्रयोजनार्थ केलेली अतिक्रमणे नियमानुकूल करणे - संगणकीय प्रणाली टप्पा - २.

संदर्भ:- १. ग्राम विकास विभागाकडील शासन निर्णय क्र. प्रआयो-२०१८/प्र.क्र.३४८/यो-१०, दि. १६.०२.२०१८.
२. ग्राम विकास विभागाकडील शासन परिपत्रक क्र. प्रआयो-२०१८/प्र.क्र.२५६/यो-१०, दि. २०.०८.२०१८.
३. शासनाचे समक्रमांकाचे पत्र दि. ०५.११.२०१८, दि. १९.११.२०१८, दि. २४.१२.२०१८, दि. २५.०१.२०१९ व दि. ११.०१.२०२१.
४. शासनाचे समक्रमांकाचे पत्र दि. १२.१२.२०१९ व २८.०२.२०२०.

ग्रामीण भागातील शासकीय जमिनीवरील निवासी प्रयोजनार्थ केलेली अतिक्रमणे नियमानुकूल करणेबाबत उपरोक्त शासन निर्णय व परिपत्रक अनुक्रमे १ व २ अन्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. उपरोक्त संदर्भिय शासन पत्रे क्र. ३ अन्वये संगणक प्रणालीवरती अतिक्रमणाच्या नोंदीबाबत करावयाच्या कार्यवाहीची कार्यपध्दती विशद करण्यात आलेली आहे.

२. शासकीय जमिनीवरील निवासी प्रयोजनार्थ केलेली अतिक्रमणे नियमानुकूल करण्याकरीता संदर्भिय पत्र क्र. ४ अन्वये "नोंदणी टप्पा -२ (Phase-II)" ची मुदत दि. १५.१२.२०१९ ते ३०.१२.२०१९ व दि. ०१.०३.२०२० ते १५.०३.२०२० पर्यंत उपलब्ध करुन देण्यात आली होती.

३. तथापि, राज्यातील ग्रामीण भागातील बऱ्याचशा अतिक्रमणांची नोंद घेण्याची प्रक्रिया प्रलंबित असल्याची बाब महाआवास अभियान अंतर्गत घेतलेल्या आढावा बैठकामध्ये क्षेत्रीय कार्यालयानी मागणी केली आहे. तसेच नागरिकांनी व लोकप्रतिनिधींनीही ही बाब निदर्शनास आणल्याने "नोंदणी टप्पा -२

Scanned by CamScanner

( Phase-II )" मध्ये "अतिक्रमणाची नोंद संगणकीय प्रणाली सुविधा" दि. ०१.० ३.२०२१ ते १५.०३.२०२१ पर्यंत पुनःश्च उपलब्ध करुन देण्यात येत आहे. त्याबाबतच्या सूचना खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.

१. अतिक्रमणाची डेटा एन्ट्री करण्याची सुविधा संगणक प्रणालीवर दि. ०१.० ३.२०२१ पासून "नोंदणी टप्पा -२ ( Encroachment Data Entry Phase-II )" मध्ये उपलब्ध होईल.

२. ज्या अतिक्रमणाच्या नोंदी (डेटा एन्ट्री) संगणक प्रणालीवर यापूर्वी घेण्यात आलेल्या आहेत त्यांच्या नोंदी पुनःश्च करण्यात येऊ नये.

३. ज्या ग्रामपंचायती कार्यक्षेत्रात एकही अतिक्रमणाच्या नोंदी नाही व तसा ग्रामसभेचा ठराव संगणक प्रणालीवर नोंदविला (Upload) असल्यास त्यांना ही सुविधा उपलब्ध होणार नाही.

४. संगणक प्रणालीवर नोंद करताना यापूर्वी दिलेल्या सूचनांचे काटेकोर पालन करण्यात यावे. तसेच शासन समक्रमांकाचे पत्र दि. २३.०८.२०१९ सोबत जोडलेल्या सुधारित "परिशिष्ट - अ" तयार करुन त्यांची नोंद संगणकीय प्रणालीवर घेण्यात यावी.

५. अतिक्रमण नियमानुकूल करण्याची प्रक्रिया मर्यादित कालावधीत पूर्ण करण्यासाठी संगणकीय प्रणालीवर नोंद करण्याची अंतिम मुदत दि. १५.०३.२०२१ सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत राहील. त्यानंतर संगणक प्रणालीवर नोंद करण्याची सुविधा उपलब्ध होणार नसल्याने सर्व प्रलंबित अतिक्रमणाची नोंदी संगणक प्रणालीवर होतील याची दक्षता घ्यावी.

६. संदर्भाधिन शासन निर्णय/परिपत्रकामध्ये नमुद केल्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

( हे. सु. पाठक )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत :

१. संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, ४ था मजला, दक्षिण कक्ष, सिडको भवन, सिबीडी बेलापूर, नवी मुंबई ४००६१४.
२. प्रोजेक्ट मॅनेजर, सीएससी ई, गव्हर्नन्स इंडिया, प्रा.लि. यांना कळविण्यात येते की, सदर पोर्टल, स्कॅनिंग व डेटा एन्ट्री साठी दि. १५.०३.२०२१ रोजी सायं. ६.०० वा बंद करावे.

Scanned by CamScanner